माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार

तक्रार क्रमांक: ७४/२०२१

तक्रारकर्ता	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी
श्री. कमलेश शांतीलाल शाह, फ्लॅट नं. ३०२, तुलसी अपार्टमेंट, टेलीफोन एक्सचेंज, सि.ए. रोड, नागपूर	उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर	नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर

सुनावणी दिनांक २१.०७.२०२६

तक्रारकर्ता, श्री. कमलेश शांतीलाल शाह यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार दिनांक २२.०३.२०२१ रोजी आयोगाकडे थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यानुषंगाने सदर तक्रारीवर आज दिनांक २१.०७.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता ,श्री. कमलेश शांतीलाल शाह उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर श्री. उमेश हिरालाल मदने उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार द्वितीय अपील अर्ज दाखल न करता " Prayer or relief sought :- Action u/s 20 of RTI and compensation under RTI act for an unnecessary harassment. penal action under sec. 20(1) & (2) be initiated against the PIO. Grounds for the Prayer/relief :- नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर के मालीकी व नियंत्रण अंतर्गत नमूद औद्योगीक वापर के भुखंड के लिए नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर व्दारा पावर नाहरकत प्रमाणपत्र देने से नकार देने पर मे. प्रवेश इन्टरप्राईज, प्रोपाईटर श्रीमती प्रतिभा प्रमोद खंडेलवाल व्दारा लकडगंज झोन ८ मे पावर नाहरकत प्रमाणपत्र प्राप्ती के लिए अर्ज दाखल करने पर सहा. आयुक्त लकडगंज झोन ८ व्दारा स्वम:के अधिकार क्षेत्र मे. नही होते हुए भी मे प्रवेश इन्टरप्राईज, प्रोपाईटर श्रीमती प्रतिभा प्रमोद खंडेलवाल को कोल्ड स्टोरेज के लिए आवश्यक विद्युत पावर की नाहरकत प्रमाणपत्र सहा. संचालक नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर के व्दारा सिफारस प्रदान करने पर जारी किया है. वास्तव मे यह मे. प्रवेश इन्टरपा्रईज, प्रोपाईटर श्रीमती प्रतिभा प्रमोद खंडेलवाल के व्दारा बांधकाम की गई इमारत कोल्ड स्टोरेज की ना होकर वर्कशॉप की इमारत थी. सहा. आयुक्त लकडगंज झोन ८ व्दारा आरोग्य विभाग मार्फत कोल्ड स्टोरेज के टेड की नाहरकत प्रमाणपत्र देने से मे. प्रवेश इन्टरप्राईज, प्रोपाईटर श्रीमती प्रतिभा प्रमोद खंडेलवाल ने बांधकाम सुरू इमारत का इस्तेमाल माल स्टोरेज के लिए किया परिणाम स्वरुप दि.

३०.०१.२०१० की यह इमारत गिर गई जिसमे १८ मजदूर की मृत्यू तथा १४ कामगार जख्मी हुए है. यह बाबत अेन्टी करप्शन ब्युरो व्दारा जॉच सुरू है. भ्रष्टाचार करके नाहरकत प्रमाणपत्र जारी करने की सिफारस सहा. संचालक नगर रचना विभाग, म.न.पा.नागपूर व्दारा किए जाने के कारण नगर रचना विभाग कार्यालय, म.न.पा. नागपूर से नस्ती गायब कर दि गई है. परंन्तु मुझे लकडगंज झोन ८ से वर्ष २०२० मे माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत अर्ज दाखल करने पर सहा. संचालक नगर रचना विभाग, महानगरपालिका नागपूर का नाहरकत प्रमाणपत्र देने बाबत का सिफारस किया पत्र प्राप्त हुआ है. अत: यह प्रमाणीत होता है की, दृष्टहेतू से कमलेश शाह को नस्ती निरीक्षण करने नही दिया है. अत:जनहित को देखते हुए कमलेश शांतीलाल शाह के व्दारा दि. १५.०२.२०१३ की दाखल किए अर्ज जिस पर कनिष्ठ लिपीक नगर रचना विभाग, म.न.पा. नागपूर का रबरी शिक्का नमुद है. यह अर्ज किसकें पास भेजा गया? तथा भेजे जाने के बाद यह अर्ज पर क्या किया गया है? महाराष्ट्र सार्वजनिक दस्तावेज अभिलेख अधिनियम २००५ अंतर्गत कार्यवाही अपेक्षित यह बाबत मा. आयुक्त को प्राप्त अधिकार अनुसार कार्यवाही अपेक्षीत है. " अस्से कारण नमुद करुन कलम १८(१) नुसार थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांत त्यांनी दिनांक १५.०२.२०१३ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, (बांधकाम)नगर रचना विभाग, म.न.पा. नागपूर यांचेकडे माहिती अर्ज सादर करुन प्रपत्र-अ नुसार " 1) प्रवेश इंटरप्राईसेश (कोल्डस्टोरेज) व्दारा मनपा झोन ८ लकडगंज में पावर N.C के लीए अर्ज दिया उस अनुशंसा से झोन ८ असीस्टंट कमीश्नर गणेश राठोड व्दारा आपके पास memorandam २३.०९.२०१० को Trade NOC के लीए पत्र भेजा था मुझे आपके व्दारा दी गई NOC की सत्य प्रत चाहीए. २) आपके विभाग व्दारा निर्मीत प्रवेश इंटरप्रासेश की संपूर्ण नस्ती अवलोकन सोमवार दि. १८.०२.२०१३ को दोपहर ३ बजे मुझे चाहीए. यह माहिती अधिकार अधिनियम २००५ के अंतर्गत निर्देशीत की नस्ती अवलोकन मांगने पर ३ घंटे बाद अवलोकन हेतु मिलनी चाहीए. फीरभी मै आपको ३ दिन का समय दे रहा हु I ३) आपके जानकारी के लिीए इस मांग पत्र के साथ NMC Lakdadganj Zone ८ का Memorandam पत्र की सत्यपत्र जोड रहा हु. आपके सुविधा के लिए. " अशी माहितीची मागणी केली आहे.

सदर अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

युक्तीवाद:- आज सुनावणीस उपस्थित तक्रारकर्ता, श्री. कमलेश शांतीलाल शाह यांनी आयोगास सुनावणी दरम्यान कथन केले की, त्यांनी दाखल केलेल्या दि. १५.०२.२०१३ रोजीच्या माहिती अर्जानुसार तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांच्यावर शास्ती करण्यात यावी, असे आयोगास विनंती केली.

विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर, श्री. उमेश हिरालाल मदने सुनावणीस उपस्थित असून, तक्रारकर्ता यांना माहिती अर्जानुसार तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याबाबतचे कोणतेही कागदपत्र आयोगास सादर केले नाही. विद्यमान जनमाहिती अधिकारी हे तक्रारकर्त्यास माहिती दिली होती, ही बाब सिध्द करू शकले नाही. तसेच तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झाल्याचे आयोगास सांगितले.

निष्कर्ष:- सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पाल्लिका, नागपूर यांनी दि. १५.०२.२०१३ रोजीच्या माहिती अर्जावर तक्रारकर्ता, श्री. शाह यांना माहिती प्रदान करणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी माहिती अर्जानुसार कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

२. माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजेच 30 दिवसात अपीलार्थीस/पत्रव्यवहार करणे/शुल्क कळविणे/निरिक्षण देणे/ कार्यवाही प्रलंबित असल्यास तसे पत्रान्वये कळविणे याबाबी अपेक्षित आहे. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत तक्रारकर्ता यांना कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

३. सबब, तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चे उल्लंघन केले असून, त्यांच्यावर शास्तीची कारवाई करणे अपेक्षित आहे. तत्कालीन जनमाहिती अधिकारी जरी सेवानिवृत्त झाले असले तरी, नियमानुसार त्यांच्यावर सेवानिवृत्त झाल्यापासून चार वर्षापर्यंत कारवाई केली जाऊ शकते.

४. तक्रारकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करण्याकरिता वारंवार खेटे घालावे लागले,त्यामुळे त्यांना शारिरीक/मानसिक त्रास झालेला आहे, त्यामुळे ते नुकसान भरपाईस पात्र ठरतात.

५. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर यांनी तक्रारकर्ता, श्री. शाह यांच्या दि. १५.०२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार निशुल्क माहिती प्रदान करणे आवश्यक आहे.

सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत **तक्रारकर्ता यांच्या** दिनांक-१५.०२.२०१३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी व **त्याची पोहच आयोगास सादर करावी.** तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) **तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर **श्री. चुन्नीलाल झाडे यांचेवर रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती कायम करण्यात येत आहे.**

३) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २०(१) व कलम १९ (८)(ग) अन्वये संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर **श्री. चुन्नीलाल झाडे** यांच्यावर रु. २५,०००/- **(अक्षरी पंचवीस हजार रुपये फक्त)** इतकी शास्ती लावण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

४) संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर **श्री. चुन्नीलाल झाडे** यांच्या निवृत्ती वेतनातुन शास्तीची रक्कम खालील लेखा शिर्षाखाली जमा करावी व वसुल केलेल्या रकमेच्या चालानाच्या प्रती आयोगास सादर कराव्या, असे प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर यांना आदेशित करण्यात येते.

लेखाशिर्ष :-
००७० - इतर प्रशासनिक सेवा
६० - इतर सेवा
८०० - इतर जमा रक्कम
१८ - माहितीचा अधिकार ००७०-०१६१

५) संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी हे वर नमूद केल्याप्रमाणे नियमितपणे शासकीय कोषागारात शास्तीच्या रकमेचा भरणा करतील याची प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर यांनी दक्षता घ्यावी.

६) शास्तीसंदर्भातील या प्रकरणाचा आयोगाकडील वार्षिक अहवालामध्ये समावेश होत असल्यामुळे शास्तीची वसुली करण्यात आल्यानंतर त्या संदर्भातील अहवाल प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर यांनी आयोगाकडे सादर करावा.

७) संबंधीत प्राधिकरण उप अभियंता ,नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर यांनी सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (८) (ख) अन्वये **रु. १०,०००/- (अक्षरी दहा हजार रुपये फक्त)** इतकी नुकसान भरपाई तक्रारकर्त्यास महानगर पालिका, नागपूर यांच्या खात्यातून धनादेशाद्वारे अदा करावी व त्याची पोच आयोगास सादर करावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

८) सदर आदेशाची प्रत तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

९) उपरोक्त आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: २१.०७.२०२६

जा.क्र. ६४२४ दि. 27 JUL 2026

E:\SN/21.07.2026/तक्रार क्र.74-21-शाह